गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे मुलांच्या व मुलींच्या वसतीगृहाचे बांधकामाकरिता आदिवासी उपयोजनेंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता निधी वितरीत करणेबाबत. **(लेखाशिर्ष २२०२ एच६६१)**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१७ / प्र.क्र. ०३ / कार्यासन.६**
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख:- ०७/०३/२०१८

वाचा -

१) वि. वि, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७ /प्र.क्र.६८ / अर्थ-३, दि. ०१.०४.२०१७.
२) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.७५ / अर्थ-३, दि. १८.०४.२०१७.
३) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.९४ / अर्थ-३, दि. ३०. ०६.२०१७ व ०६/०२/२०१८
४) शासन समक्रमांकीत शासन निर्णय दि. ०१ नोव्हेंबर, २०१७.
५) उच्च व तंत्रशिक्षण विभागाची नस्ती क्र. गोंविग-१११३ / प्र. क्र.२०१/विशि-२.

**शासन निर्णय :-**

आदिवासी उपयोजनेंतर्गत गोंडवाना विद्यापीठाची स्थापना व विकास याकरिता मागणी क्र. टी-५, २२०२ सर्वसाधारण शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ०३- विद्यापीठ व उच्च शिक्षण, ७९६- जनजाति क्षेत्र उपयोजना अंतर्गत योजना, (०१) (०१) गोंडवाना विद्यापीठाची स्थापना व विकास, गडचिरोली ( २२०२ एच ६६१ ), ३५- भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता अनुदान यालेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता रु.१००.०० लाख इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. यापैकी संदर्भाधीन वित्त विभागाच्या दि. ३०/०६/२०१७ अन्वये विहीत केलेल्या निधी वितरण मर्यादेत संदर्भ क्र. ४ येथील शासन निर्णयाद्वारे रु. ७०.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.

दरम्यान वित्त विभागाने दि.०६/०२/२०१८ अन्वये निधी वितरण मर्यादेत केलेल्या वाढीच्या अनुंषगाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या संदर्भाधीन क्र. ५ येथील प्रस्तावास अनुसरुन आदिवासी उपयोजनेंतर्गत गोंडवाना विद्यापीठाची स्थापना व विकास याकरिता मागणी क्र. टी-५, २२०२ सर्वसाधारण शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ०३- विद्यापीठ व उच्च शिक्षण, ७९६- जनजाति क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना, (०१) (०१) गोंडवना विद्यापीठाची स्थापना व विकास, गडचिरोली ( २२०२ एच ६६१), ३५- भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता अनुदान या लेखाशिर्षाखालील उर्वरीत रु.१०.०० लाख ( अक्षरी रुपये दहा लाख फक्त) इतका निधी प्रशासकीय विभाग / नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BEAMS ) वितरीत करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

२. प्रकरणी नियंत्रण अधिकारी / विभागप्रमुख यांनी खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखडयानुसार याच वर्षात सदर निधी खर्च होईल याची दक्षता घ्यावी. तसेच उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय /उपलेखाशिर्षनिहाय साध्य झालेले भौतिक उद्दिष्टाबाबतची माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक; संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास व उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवणेबाबत सूचना देण्यात यावी.

३. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेली तरतूद फक्त आदिवासी लाभार्थ्यांकरिता व आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत खर्च करण्यात यावी.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या वाचा क्र.१ , २ व ३ अन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत असून सदर शासन निर्णयातील अटींची पुर्तता होत असल्याची उच्च व तंत्र शिक्षण विभागाने खात्री करावी.

६ सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201803031253140524 असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2018.03.09 11:53:09 +05'30'

( रविंद्र दि. औटे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
३. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर.
४. वित्त विभाग (अर्थसंकल्प- १९), मंत्रालय, मुंबई.
५. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. महालेखापाल (लेखापरिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
७. कार्यासन क्र. २ व ९, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
८. निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग